## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२५ ( प्रतिनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ अंतर्गत कला व मानव्यविद्या प्रशाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या "ट्रान्सफॉर्मेटिव रीइंजिनियरिंग ऑफ करिकुला इन ह्यूमॅनिटीज" या विषयावरील दोन दिवसीय कार्यशाळेचा समारोप आज बुधवार, दि. २५ मार्च रोजी उत्साहात पार पडला.

समारोप सत्राला गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. प्रशांत बोकारे, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य अनिल राव, अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेंद्र नन्नवरे तसेच कला व मानव्यविद्या प्रशाळेचे संचालक प्रा. रामचंद्र भावसार उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा. प्रशांत बोकारे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी ही काळाची गरज असल्याचे सांगितले. "राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे केवळ धोरण नसून विद्यार्थ्यांमध्ये जीवन कौशल्य विकसित करणारे प्रभावी साधन आहे. याची योग्य अंमलबजावणी झाली नाही, तर समाजाचे मोठे नुकसान होऊ शकते," असे त्यांनी स्पष्ट केले. समाजात वाढत असलेल्या नकारात्मकतेवर मात करण्यासाठी शिक्षण हेच प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. तसेच भारताला 'जगदगुरु' बनवायचे असल्यास जीवनकौशल्यावर आधारित शिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यापीठामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध अभ्यासक्रमांची माहिती दिली. या कार्यशाळेतून शिक्षकांना मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे अत्यंत महत्त्वाचे असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण येत्या काळात शिक्षण क्षेत्रात उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणच्या पार्श्वभूमीवर बदलत्या काळातील शिक्षणपद्धती, अभ्यासक्रमातील नवकल्पना आणि कौशल्याधारित शिक्षण यावर या कार्यशाळेत सखोल चर्चा करण्यात आली. राज्यभरातून एकूण ७२ विविध विद्यापीठातील प्राध्यापकांनी नोंदणी करून सक्रिय सहभाग नोंदविला.

समारोप सत्राचे प्रास्ताविक अधिष्ठाता प्रा. जगदीश पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ. विणा महाजन यांनी केले. सूत्रसंचालन इशिका गुप्ता व खेमराज पाटील यांनी केले. या कार्यशाळेमुळे शिक्षण क्षेत्रात नवे दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होणार असून, अभ्यासक्रमात गुणवत्तापूर्ण बदल घडविण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २५ मार्च, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता